<u>प्रतिवादी यांच्या तर्फे सा.क्र.४</u>

<u>वादीकरिता उलट तपास विधीज्ञ श्री. पी. जी. जवळगेकर यांच्या वतीने पुन्हा शपथेवर सुरू</u>

८. रमेश पांडूरंग शेळके, व्यंकट शेळके, विजयकुमार शेळके व बाबूराव शेळके या सर्वांची शेती सर्वे क्र. १, २, ३, ४, ५, ६ आणि सर्वे क्र. ७ मध्ये आहे. एकच सर्वे क्रमांक मध्ये शेती असणे म्हणजे त्याचा क्रमांक एकच असतो असे होऊ शकत नाही. एकच सर्वे क्रमांक म्हणजे अनेक क्रमांक असतात असे नाही, साक्षीदार पुढे स्वत: सांगतात त्यास ऑब्लीक पडू शकतात.

९. माझ्या जमिनीचा सर्वे क्र.१६६, १६८ व १६९ असे आहेत. मी आजरोजी जाणून–बुजून खोटी साक्ष देत आहे हे म्हणणे खरे नाही. रघूनाथ केशव पाटील व रघुनाथ केशव जाधव हे दोन वेगवेगळे व्यक्ती आहेत हे म्हणणे खरे नाही. मी दावा मिळकतीचा दूरांन्वयेही शेजारी नाही हे म्हणणे खरे नाही. मला गौर शिवारामध्ये सर्वे क्र.१७२ मध्ये शेती आहे हे म्हणणे खरे आहे. त्याव्यतिरिक्त मौजे मसलगा शिवारात मला शेती नाही हे म्हणणे खरे नाही. दावा मिळकतीचा मी शेजारी नसल्यामुळे दावा मिळकतीच्या घडामोडीबाबत मला काहीही माहीत नाही हे म्हणणे खरे नाही. वादीने प्रतिवादीस दावा मिळकत विक्री केली होती हे म्हणणे खरे आहे, साक्षीदार

पुढे स्वत: सांगतात विक्रीचा ठराव झालेला नव्हता. मी खोटी साक्ष देत आहे हे म्हणणे खरे नाही. माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा आहे हे म्हणणे खरे नाही.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

Digitally signed by PANDE RAVI VIJAYPRASAD
Date: 2025.11.10 17:26:26 +0530

(रवि वि.पांडे)

दि.१०/११/२०२५

दिवाणी न्यायाधीश, व.स्तर,
निलंगा, जि.लातूर